शासकीय अर्थव्यवहारांत फसवणुकीस आळा घालणे.

३५८

महाराष्ट्र शासन,
वित्त विभाग,
परिपत्रक क्र. टीआरडब्ल्यु-१३७८/२३८९/सीआर-७८/एडीएम-९,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ जानेवारी १९८०

CR1980011801

शासनाच्या निदर्शनास असे आले आहे की, (धनादेशाव्दारे) चेक पुस्तकाव्दारे (Cheques) बँकेकडून पैसे काढतांना महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८, खंड १, व तसेच धनादेश पध्दतीचा स्वीकार करतेवेळी देण्यात आलेल्या सूचना संबंधितांनी नीट न पाळल्यामुळे बँकेला खोटे धनादेश सादर करुन पैशाचा अपहार करण्याचा संभव आहे, असे प्रकार होऊ नये म्हणून सर्व संबंधितांचे लक्ष महाराष्ट्र कोषागार नियम, १९६८ खंड १ मधील नियम १५३, १६४ ते १६६, २९७ (२) ४११ व ४१९ आणि कोषागारांत धनादेश पध्दति बद्दलचे नियमातील परिच्छेद तेरा (XIII) कडे वेधण्यात येत आहे. सदरहू नियमांतील तरतुदी सर्व संबंधितांनी कटाक्षाने पाळणे आवश्यक आहे असे शासनाचे आग्रहपूर्वक मत आहे ह्याची त्यांनी नोंद घ्यावी. शासन असाही आदेश देऊ इच्छिते की ह्यापुढे निम्नलिखित कार्यवाही करुन त्यांनी असे गुन्हेगारीचे प्रकार टाळण्याचे आटोकाट प्रयत्न करावेत.

१) धनादेश पुस्तके अधिकाऱ्यांनी स्वतः जवळ सुरक्षित जागी ठेवावीत व महाराष्ट्र कोषागार नियम-१६५ व १६६(१) व (२) अनुसार कार्यवाही करावी.

२) धनादेश पुस्तके वापरांत आणतांना पुस्तक क्रमांक तसेच त्यांतील धनादेश क्रमांक बँकेस कळविणे आवश्यक आहे. (महाराष्ट्र कोषागार नियम-१६४)

३) धनादेश पुस्तके गहाळ झाल्यास किंवा कोरे धनादेश हरविल्यास त्याची माहिती त्वरित संबंधित कोषागार अधिकारी तसेच बँकेस द्यावी. जी धनादेश पुस्तके रद्द झाली असतील ती "<u>रद्द</u>" असे शब्द धनादेश व त्याची प्रत ह्यावर लिहून कोषागार अधिकाऱ्याकडे परत करावीत.

४) धनादेश देताना महाराष्ट्र कोषागार नियम १६६(४) मधील सूचना तंतोतंत पाळण्यात याव्यात.

५) ज्या वेळी शासकीय सेवेत नसणाऱ्या व्यक्तीस धनादेशाव्दारे रक्कम द्यावयाची असेल तेव्हां ती शक्यतो रेखित धनादेशाव्दारे देण्यात यावी. रु.१०००/- किंवा त्याहून अधिक रकमांचे धनादेश रेखित (crossed) करुनच देण्यांत यावेत.

६) आहरण व वितरण अधिकाऱ्यांनी महाराष्ट्र कोषागार नियम-१५३ (बारा) प्रमाणे बाहेरगांवी पाठविण्याच्या रकमेसाठी आवश्यक धनादेश/ दर्शनी हुंडी व त्यांच्या कार्यालयीन खर्चासाठी लागणारी रक्कम अशा दोन वेगळ्या रकमा देयकावर दाखवून त्याप्रमाणे कोषागाराकडून वेगळे धनादेश / दर्शनी हुंड्या मागाव्यात.

७) ज्या ज्या वेळी देयकाच्या निव्वळ देय रकमा रु. ५०,०००पेक्षा जास्त रकमेच्या असतील त्यावेळी आहरण व वितरण अधिकाऱ्यांनी एकाहून अधिक धनादेश मागावेत. त्यांनी जर तसे केले नसेल तर कोषागार अधिकारी अशा देयकांच्या बाबतींत स्वतःच एकाहून अधिक धनादेश देतील. (कोषागारांत धनादेश पध्दतिबद्दलचे नियम (परिच्छेद सात) (२) (इ) यथावकाश सुधारित करण्यांत येतील).

शामसु. रेटा/ एच-१२५६ (७०००+५-१-८०)

संचालक, लेखा व कोषागारे, महाराष्ट्र मुंबई ह्यांचे परिपत्रक क्रमांक टीआरवाय १०८०/ १९/सीआर-३०३६/डीएटी-अकरा, दिनांक तिरंक.

Attention of the Treasury Officers is invited to the provisions contained in para 3 below Section VII of the Booklet of Rules of Procedure on the introduction of System of Payment by cheque according to which a single cheque can be prepared in respect of two or more bills when they are payable to the same person/office. However, it has been brought to the notice of Government by Reserve Bank of India that large number of salary cheques are being issued to one and same Department resulting in presentation of large number of cheques at the counters of the Banks. If the provisions referred to above are rigidly followed by treasuries they would not be required to issue large number of cheques to one and the same department unless a single Drawing and Disbursing Officer operates on different major heads which cases may be very few. This would also minimise heavy rush at the counters of the bank and also save the labour at the Treasuries in the issue of Treasury cheques and their ultimate accounting and reconciliation in the Books of Treasuries.

All the Treasury Officers are therefore directed to follow the provisions referred to above strictly and avoid complaints from the Banks in future.

OFFICE OF THE
SETTLEMENT COMMISSIONER AND
DIRECTOR OF LAND RECORDS,
MAHARASHTRA STATE,
POONA.

NO. AC-4641/CR-1610/A-3/80
PUNE Date – 31st march 1980

K.W.P.C

for S.C. & D.L.R, M.S.
Pune

Copy fdd. w.c.s. to all Dy. Dir. of L.R's for information.

for [signature]
Settlement Commissioner
& Director of Land Records,
Maharashtra State, Poona.

1249

Copy to D.O.E.

H-1256(7,000+5-1-80)-2a.